# शिव अवतरण

ओमशान्ति मीडिया

महाशिवरात्री विशेषांक




# ‘‘विश्व रचयिता परमात्म्या’’चा भारतामध्ये उदय...!

**‘‘आपल्यावर एखादे संकट येते तेव्हा विश्वातील आपआपल्या देवीदेवता, कुलदेवतांची आपण आठवण करतो आणि जेव्हा या देवीदेवता, कुलदेवतांद्वारे स्वीकारले जाते कि आता आम्ही काही करू शकत नाही तेंव्हा आपण चात्रका प्रमाणे आकाशाकडे पाहतो आणि म्हणतो की, हे ‘‘परमेश्वरा’’ मला या संकटातून आता तुम्हीच बाहेर काढू शकता. अनेक वेळा तुम्हीच सावरले आहे. आता तेच निराकार परमात्मा, विश्व रचयिता, आपल्या सर्वांचे मात-पिता स्वत: भूतलावर अवतरीत होऊन नि:स्वार्थ स्नेह आणि प्रेमाने आपल्याला त्या संकटांपासून मुक्ती देत आहेत. ‘भगवान्’ शब्द तसाही ऐश्वर्य वाचक आहे, म्हणूनच त्याचे लोक भजन-पूजन करतात. तो दु:ख निवारक,संकटमोचक परमात्मा आपल्याला पुन: आठवण करून देत आहे. त्याच्या याच कार्यासाठी विश्वभरात असे ही म्हटले जाते- ‘‘तू सत्य परमात्मा,तुझ्या शिवाय,ह्या पृथ्वीवर एक पान सुद्धा हलू शकत नाही, एक कळी सुद्धा उमलू शकत नाही.’’**

आपण जेव्हा बाजारात जातो तेव्हा पाहतो कि फलकावर लिहीलेले असते कि ‘निष्णात आर्कीटेक्ट’,तर दुसरीकडे लिहीलेले असते ‘कुशल डेन्टिस्ट’, तर कुठे लिहीलेले असते- ‘उत्तम इलेक्ट्रिशियन’. मग आपण लक्षात ठेवतो आणि जर दात दुखू लागले तर डेन्टिस्टकडे जाऊन उपचार करतो.घर बांधण्याचा नकाशा तयार करायचा असेल तर आर्किटेक्टकडे जावे लागेल, तसेच विजे संबधी काही काम असेल तर इलेक्ट्रिशियन कडे जावे लागेल.त्या लोकांच्या व्यवसायांप्रमाणेच त्यांची व्यावसायिक नावे आहेत,तसेच परमात्म्याची तर अशी कित्येक कर्त्तव्य वाचक नावे आहेत ज्याद्वारे हे सिद्ध होते कि तो दु:खहर्ता,सुखकर्ता,पापांपासुन मुक्त करणारा,सर्व मनुष्यमात्रांचे कल्याण करणारा ज्ञानामृत पाजून, विघ्न आणि संकटे दूर करणारा आहे. तर मग मनुष्याचे ‘परमात्मा’ या नावाने सजलेल्या जाहीरात फलकाकडे लक्ष्य का जात नाही? तो परमात्म्याच्या कर्त्तव्य वाचक नावांना जाणून सुद्धा त्याच्या पर्यंत का पोहचू शकत नाही? तो आज दु:खी आहे आणि सुखाची इच्छा करीत आहे तर तो परमात्म्याकडून सुख का प्राप्त करवून घेत नाही? मनुष्य आपली विघ्ने आणि संकटे दूर करुन खजाने भरपूर करण्याचा उपाय का करीत नाही? जर त्याला परमात्म्याचा सत्य परिचय असता तर त्याची झलक आज काही वेगळीच असती.सर्वात मोठी विटंबना




**हे आत्म्यांनो... आता जाणून घ्या की ज्या ईश्वराला आपण मंदिर, मस्जिद आणि गुरूद्वारांमध्ये शोधले, तीर्थ यात्रा केल्या आणि तरी सुद्धा त्याच्यापासुन दूरच राहिलो.तोच मी निराकार परमपिता तुम्हा सर्व आत्म्यांना दु:खांपासुन मुक्त करण्यासाठी , नवीन सतयुगी भारताची स्थापना करण्यासाठी आणि सर्व आत्म्यांना सुखाची-शांतीची प्राप्ती करवुन देण्यासाठी या भूतलावर पुन: अवतरीत झालो आहे,आता जागे व्हा आणि मला ओळखा.**

अशी आहे की परमात्मा मानावे तरी कोणाला याच प्रश्नात मानव गुरफटला आहे. जर आपण त्या **कल्याणकारी परमपिता परमात्म्याची** साथ घेतली असती तर भारताची अशी दूर्दशा कधीच झाली नसती. यावरून स्पष्ट होते की मनुष्याला तर या गोष्टीचे ज्ञानच नाही की आता त्याला परमात्म्याचा परिचय प्राप्त करून घेण्याची आवश्यकता आहे ,जेणे करून त्याच्या दु:खाचा अंत होईल आणि त्याला संपूर्ण व स्थायी सुखाची प्राप्ती होईल. या शिवाय आता आपल्या समोर कुठलाही अन्य विकल्प ऊरलेला नाही . या वेळी आपण दोनच कार्ये करू शकतो एक तर ईश्वर आहे हे मान्य करू किंवा अमान्य करू ज्यामुळे आपली दुविधा दूर होईल,कारण? कारण आपण मान्य किंवा अमान्य केल्याने परमात्म्याचे अस्तित्व तर मिटू शकणारच नाही. तो सत्य आहेच, तर चला आपण त्यांच्याकडे जाण्यासाठी एक पाऊल पुढे उचलूया.



दादी जानकी, मुख्य प्रशासिका,ब्रह्माकुमारीज़

आज चारही दिशांत एकच लहर पसरलेली आहे ,की कोणी तरी आमच्या मनाला सांत्वना द्यावी, कोणी तरी आमच्यावर प्रेम करावे,आमच्या भावनांना समजावे.आपल्या मनाला चैन व आराम देण्यासाठी दिलाराम परमात्मा शिव आता या धरतीवर अवतरीत झाले आहेत आणि आम्ही आता त्यांचे पुरेपूर सुख घेत आहोत. आमची अशी इच्छा आहे कि आपण सर्वांनी त्या दिलाराम परमात्म्या पासून मिळणा-या सुखाचा पुरेपूर आनंद घ्यावा. आता ती सुवर्ण संधी आपल्या सर्वांच्या नज़रे समोर आहे कारण परमात्मा शिव या धरतीवर आता अवतरीत झाले आहेत आणि त्यांच्या अवतरणाने नविन दुनियेचे आगमन निश्चित केलेले आहे.

भारत देश पुन: देवभूमी व धन-धान्य संपन्न बनणार आहे,ज्या देवभूमि स्वर्गात सम्पूर्ण सुख-शांति व संपत्तीचे अखूट भंडार असेल. जिथे एक धर्म,एक राज्य, एक भाषा असेल. अशा स्वर्णिम दुनियेचा शुभ संदेश जन-जनांपर्यंत पोहचविणे आपण सर्वांचे कर्त्तव्य आहे.

परमात्मा शिवाची आपणा सर्व मुलांकडून हीच आशा आणि अपेक्षा आहे की हे मुलांनो तुम्हाला जे काही प्राप्त होत आहे ते ज्ञान व परमात्म प्राप्तिच्या सुखाचा आनंद सर्वांना वाटा आणि त्याची वृद्धी करत जा. आम्ही तर प्रभू पित्याला ओळखले आहे तर आता अनेकांना ही त्याला ओळखावे. शेवटी असे होता कामा नये की कोणी प्रभू पित्याच्या संदेशावाचून वंचीत राहील . शेवटी कोणी दोष देवू नये, कोणी असे म्हणू नये कि परमात्म्याचे अवतरण झाले आणि आम्हाला कोणी सांगितलेच नाही तेव्हा या शिवरात्रीच्या शुभ वेळी हा शिव संदेश चारही दिशांना पसरवा, जेणेकरून संपूर्ण विश्वाच्या काना-कोप-यात एकच आवाज पसरेल की आमचे ‘‘परमात्मा शिव’’ या भूतलावर अवतरीत झाले आहेत. याच शुभ आशा व शुभ भावनांबरोबर आपणा सर्वांना शिव जयंती प्रित्यर्थ हार्दीक शुभेच्छा.

## कोण आहेत शिव परमात्मा? ते राहतात कुठे?

परमात्मा शिव, देवाधिदेव आहेत. विश्वातील



सर्व आत्म्यांचे, मग ते देवात्मा असो,महान आत्मा असो,पुण्य आत्मा असो किंवा धर्मात्मा असोत सर्वांचे ते पिता परमपिता परमात्मा शिव आहेत. ते अजन्मा आहेत,अभोक्ता आहेत. त्यांचे रूप निराकार ज्योतिर्बिंदू आहे, ते परमधाम निवासी आहेत. **‘शिव’** शब्दाचा अर्थ **‘‘कल्याणकारी’’**असा आहे. परमात्मा निराकार आहेत याचा अर्थ असा नाही कि त्यांना कुठलाही आकार नाही. परंतु त्यांना स्वत:चे शरीर नसल्याने त्यांना निराकार म्हटले जाते. निराकारचा अर्थ स्थूल डोळयांनी न दिसणारे सूक्ष्म ज्योतिर्बिंदू स्वरूप असा आहे.

### परमात्म्याचे निवास स्थान - परमधाम

सूक्ष्म देव लोक ब्रह्मा,विष्णू आणि शंकर पुरीं पासून आणखी दूर, त्याच्याही वर असीमीत पसरलेले प्रखर सोनेरी लाल रंगाच्या प्रकाशाचे आकाश ज्याला अखंड ज्योती महतत्व अथवा **ब्रह्म महतत्व** असेही म्हटले जाते. हे तत्व प्रकृतीच्या पाच तत्वांपेक्षा अगदी वरती आहे. त्याचा ही साक्षात्कार दिव्य चक्षूंद्वारेच होऊ शकतो. या स्थानाला ब्रह्मलोक,परमधाम, मुक्तिधाम,शांतीधाम,निर्वाणधाम ,मोक्षधाम अथवा शिवपुरी असे ही म्हटले जाते. या ठिकाणी न संकल्प आहेत न कर्म. जेव्हा आपण आपले हात आणि मुख वर पाहण्यासाठी उंचावतो तेव्हा अजाणते पणे आपल्याला हीच स्मृती असते की परमपिता परमात्मा **परमधामात** निवास करतात.

## कसे दिसतात ते ?

सर्व धर्मांमध्ये सर्वशक्तीमान परमात्म्या विषयी एक गोष्ट सर्वमान्य आहे कि परमात्मा ज्योतिर्बिंदू स्वरूप आहेत. शिवलिंगाला कुठलेही शारिरीक रूप नाही कारण ते परमात्म्याचे स्मरण चिन्ह आहे. **‘शिव’** शब्दाचा शाब्दिक अर्थ आहे- **कल्याणकारी** आणि लिंगाचा अर्थ आहे **प्रतीमा** अथवा **चिन्ह** ,तेव्हा शिवलिंगाचा अर्थ झाला कल्याणकारी परमपिता परमात्म्याची प्रतीमा. प्राचीन काळी शिवलिंग हि-याचे बनविले जात असे. हिरा प्राकृतिक स्वरूपात प्रकाशमान आहे कारण परमात्म्याचे रूप ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे. विभिन्न



धर्मांमध्ये परमात्म्याच्या याच आकाराला मान्यता प्राप्त आहे. अनेक पवित्र प्रसंगी ज्योतिस्वरूप परमप्रिय परमात्म्याच्या स्मृतीमध्ये आपण आपल्या घरात अथवा धार्मिक स्थळांवर मंदिर, गुरूद्वारांमध्ये दिपक अथवा ज्योती अवश्य प्रज्वलीत करीत आलो आहोत. भारतातही विश्व प्रसिद्ध बारा मठांना ज्योतिर्लींगम् मठ असेच म्हटले जाते.

# शिवाच्या अवतरण उत्सव -'शिवरात्री'

आत्म्यांचा जन्म होतो आणि परमात्म्याचे अवतरण. आत्मा आणि परमात्म्या मध्ये हेच प्रमुख अंतर आहे. कर्मबंधनामुळे गर्भाद्वारे जन्म होवून आत्मे जन्म-मरणाच्या चक्रात फिरतात. परंतु परमात्म्याचे आवागमन होत नाही. ते पुनर्जन्माच्या चक्रापासून मुक्त आहेत. कर्मातीत असल्यामुळे परमात्मा कुठल्याही गर्भामध्ये येत नाहीत. कोणतीही आई त्या सर्व शक्तीवान परमात्म्याला आपल्या गर्भात धारण करूच शकत नाही. जगत पित्याचा कोणी ही पिता होऊ शकत नाही. परमात्मा शिव स्वयंभू आहेत. सर्व आत्म्यांच्या कल्याणार्थ ते अवतरीत होतात अर्थात् परकाया प्रवेश करतात. ते योग बलाने प्रकृतीला वश करून, एका अनुभवी, वृद्ध मनुष्य शरीरामध्ये प्रवेश करतात आणि त्यांच्या मुखाद्वारे सर्व जीवात्म्यांना प्राय: गुप्त गीता-ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देवून सर्व अधर्माचा विनाश आणि एका सत्धर्माची पुनर्स्थापना करवितात. त्या वृद्ध अनुभवी मनुष्यालाच ते ब्रह्मा या नावाने संबोधतात. भारतवर्षात योगींच्या परकाया प्रवेशाची गोष्ट तर सर्वमान्य आहेच आणि परमात्मा शिव तर सर्व योगींचे ही ईश्वर आहेत.

परमात्म्याचे दिव्य अवतरण ज्ञान-योगाची शिकवण सर्व जीवात्म्यांना देवून त्यांना पतितांपासून पावन बनविण्यासाठी होते. जर त्यांनी गर्भातून जन्म घेतला असता तर त्या गर्भाचा काळ आणि बाल्यावस्थेचा काळ व्यर्थ गेला असता. युवा अवस्था वृद्धांना शिकवण देण्यासाठी उपयुक्त नाही. ज्यावेळी मनुष्य अनुभव संपन्न होता, अशा वानप्रस्थ अवस्थेमध्येच अध्यात्मिक शिक्षण प्रभावी पणे दिले जाऊ शकते. गर्भाद्वारे जन्म घेतल्यास परमात्म्याला ज्ञान देण्याआधी पन्नास वर्ष शरीराला परीपक्व बनविण्याची प्रतिक्षा करावी लागेल. म्हणूनच परमात्मा एका वृद्ध अनुभवी शरीरामध्ये दिव्य प्रवेश करतात आणि त्याच्या द्वारे लगेचच ज्ञान-योगाचे शिक्षण देवू लागतात.




विसाव्या शतकात ही अशाच प्रकाराचा एक असफल प्रयोग केला गेला होता. आपल्या महापरिनिर्वाणाच्या आधी गौतम बुद्धाने ही म्हटले होते कि 2500 वर्ष संपण्या पूर्वीच मी मैत्रेय नावाने पुन: जन्म घेईन. कारण त्यावेळी पुन: धर्माची ग्लानी होऊ लागलेली असेल.थियोसॉफी संघटनेची कर्णधार एनी बेसन्ट इत्यादींना सुद्धा अनुभव होऊ लागला की बुद्धाची आत्मा जन्म घेण्यासाठी उत्सुक आहे परंतु अशा शक्तीशाली आत्म्यासाठी उपयुक्त गर्भच त्यावेळी मिळाला नाही.त्यांना वाटले कि उपयुक्त गर्भा अभावी ते बुद्धाच्या पुन:श्च आगमनाची अशी स्वर्णीम संधी गमावून बसतील, तेव्हा त्यांनी दुसरा विकल्प निवडला.त्यांनी विचार केला की एका मनुष्याला इतके तयार केले जावे की ते आपल्या आशा-आकांक्षा आणि अहंकाराला विसर्जीत करून मैत्रेयाच्या अवतरणासाठी उपयुक्त वाहन बनू शकेल. त्यांनी या कार्यासाठी अनेक प्रतिभा-संपन्न मुलांची निवड केली ज्याच्यामध्ये कृष्णमूर्ती आणि त्यांचे भाऊ सुद्धा होते. प्रयोगाच्या मध्येच कृष्णमूर्तींच्या भावाचा मृत्यु झाला तेव्हा त्यांनी आपले सर्व लक्ष कृष्णमूर्तीवर एकाग्र केले. एनी बेसन्ट त्यांना इग्लंड मध्ये घेवून गेली आणि त्या काळातल्या सर्व श्रेष्ठ शिक्षकांद्वारे त्यांना उच्च शिक्षा देवू केली. कृष्णमूर्तींना सर्वोत्तम शिक्षण दिले गेले आणि त्यांनी मैत्रेयचे वाहन बनण्याची स्विकृती सुद्धा दिली. विधीवत् घोषणा केली गेली कि अमुक तीथी, अमुक काळी कृष्णमूर्ती आपल्या अहंमत्वाला पूर्ण रूपाने त्याग करतील आणि मैत्रेयाची आत्मा त्यांच्यात प्रवेश करेल. आणि मग त्यांच्या माध्यामातून मैत्रेयाची आत्मा आपले सर्व कार्य पूर्ण करेल. विश्व-इतिहासातील या अभूतपूर्व दृश्याला पाहण्यासाठी विश्वभरातील सर्व थियोसॉफीस्ट एकत्रीत झाले. परंतु अगदी ऐन वेळेवर कृष्णमूर्तींनी विद्रोह केला आणि मैत्रेयचे वाहन बनणे अस्विकृत केले. या दुर्घटनेमुळे थियोसॉफी आंदोलनाला इतका गहन धक्का बसला कि ते पुन: स्वत:ला सावरू शकले नाहीत. ☺

## होय, परमात्म्याचा आम्ही अनुभव केला

### परमात्म्याने मला मांडीवर बसविले



सम्पूर्ण विश्वात अशी व्यवस्था नाही जशी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात आहे, ही अनुभव करण्याची गोष्ट आहे, बोलण्याची नाही. मी जेव्हा परमात्म मिलनासाठी मा. आबूला पोहोचलो तेव्हा मला असा अनुभव झाला जसा एका छोटया मुलाला आपल्या घरी आई-वडीलांच्या कुशीत शिरल्यावर होतो. असे वाटले जणू ते मला गोंजारत आहेत. येथील पवित्र वातावरण आणि व्यवस्थेसारखी पारदर्शिता विश्वभरात आणखी कुठे दिसत नाही.-**श्री.महामण्डलेश्वर दर्शनसिह त्यागमुर्ति. (अध्यक्ष षड्दर्शन साधु समाज आणि धर्मस्थान ट्रस्ट, हरिद्वार.)**

### प्रभू मिलनाने भावविभोर झालो



जीवात्मा ईश्वराशी कसे भेटतात याचाअनुभव प्रजापिता ब्रह्माकुमारीज़ द्वारेच दिला जात आहे. इथे योग,ध्यान,साधना,उपासना तथा आराधनेची जी शैली शिकविली जाते त्याद्वारेच आत्मा आणि परमात्म्याचे मिलन संभव आहे. परमात्म्याने या संस्थेची स्थापनाच विश्व परिवर्तनासाठी केली आहे. डायमंड हॉलमध्ये बाबाशी मिलनाच्या वेळी मला दिव्य अनुभव झाला व साक्षात् ईश्वराची अनुभूती झाली.**रसिक पीठाधीश महंत जन्मजेयशरण. अध्यक्ष श्रीराम जन्मभूमि मंदिर निर्माण न्यास, जानकी घाट, वड़ा स्थान, अयोध्या.**

### या ज्ञानाद्वारेच सुंदर भविष्य संभव...



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचा प्रथम उद्देश्य आहे कि व्यक्ती प्रथम स्वत:ला जाणु लागेल कि मी कोण आहे, माझे कर्त्तव्य काय आहे, माझे आई-वडील कोण आहेत,माझा खरा देश कोणता आहे, माझी संस्कृती कोणती आहे? माझे मानणे आहे की आज ज्याप्रमाणे शिक्षण पद्धती पश्चिमी होत चालली आहे .तीला पुन: आपल्या संस्कृतीकडे वळवायचे असेल तर त्यासाठी अशा ईश्वरीय विश्व विद्यालयाचे असणे आवश्यक आहे. आज समाजाला सर्वात मोठी आवश्यकता आहे शांतीची, जी ब्रह्माकुमारीज़ संस्थेद्वारे समाजाला प्राप्त होऊ शकते. त्यांनी दिलेल्या ज्ञानाद्वारे भारताचे भविष्य उज्वल होवू शकेल आणि इतर राष्ट्रांचाही उद्धार होईल. -**शास्त्री जीवनदास. मैनेजिंग ट्रस्टी श्री स्वामी नारायण गुरुकुल.**

### हे ईश्वरच बोलू शकतो



ईश्वराच्या अस्तीत्वाचा अनुभव या विश्व विद्यालयातच करावयास मिळतो. मग तो मुरलींच्या माध्यमातून असो अथवा दादी-दीदींच्या मुखाद्वारे असो ,ती साक्षात् ईश्वराचीच वाणी वाटते. इथे जी जीवन जगण्याची पद्धत शिकवली जाते ती अनोखी व उच्च आहे, ज्याने समाजाची उन्नती होते. अव्यक्त बाबांशी भेटल्यानंतर माझा ही अनुभव असाच अनोखा होता. असे वाटले जसे दादीजी नसून तिथे ब्रह्माबाबाच बसले आहेत.-**जसवीर सिंह. राजस्थान अल्पसंख्यक आयोग के पूर्व अध्यक्ष.**

### आबू मध्ये साक्षात् ईश्वराचे मिलन



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात शांती आणि सद्भावनेचा संदेश दिला जात आहे. मा. आबू मध्ये येवून मला स्वर्गात आल्याचा अनुभव झाला. आम्ही साक्षात् ईश्वराला भेटलो. पैशांनी मखमली गाद्या विकत घेतल्या जावू शकतात,सुंदर बिछाना ही विकत घेतला जाऊ शकतो परंतु गाढ झोप अध्यात्मानेच प्राप्त होऊ शकते. सम्पूर्ण विश्वात या संस्थेच्या ज्ञान प्रसारामुळेच आध्यात्मिकता चारी दिशांनी पसरत आहे, जी समाजासाठी ऑक्सिजनचे काम करीत आहे.-**महामण्डलेश्वर श्री जनार्दन महाराज. सतपंत, फैजपुर.**


### या अनुभूतीला मी कधीच विसरू शकत नाही



या ईश्वरीय ज्ञानाद्वारे आपला जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोनच बदलून जातो. ही एक विना औषधाची वण्डरफुल ट्रीटमेंट आहे. आज मनाचे असे अनेक रोग आहेत ज्यासाठी कोणतेही औषध काम करीत नाही, परंतु इथे मेडिटेशनच्या प्रैक्टिसने व परमात्म्याच्या आठवणीनेच हे आजार पूर्णपणे ठीक होऊन जातात. प्रथमच मी जेव्हा बाबांना भेटलो तेव्हा माझ्या शरीरावर अक्षरश: रोमांच उभे राहिले आणि आजही मी परमात्म्याच्या त्या मिलनाला विसरू शकत नाही..-**डॉ.एस.पी.लोचड.सीनियर साइन्टिस्ट हेल्थ फिज़िक्स डिपार्टमेंट, न्यूक्लियर साइंस सेंटर, नई दिल्ली.**

## 'मी' ब्रह्माच्या भृकुटीमध्ये प्रकट झालो.

**शिव पुराणातही लिहिले आहे, शिवभगवानउवाच - ''मी ब्रह्माजीच्या ललाटात प्रकट होईन''. पुढे लिहिले आहे कि या कथनानुसार समस्त संसारावर अनुग्रह करण्यासाठी शिव ब्रह्माजींच्या ललाटामध्ये प्रगट झाले आणि त्यांचे नाव 'रूद्र' झाले. शिव पुराणात हे ही लिहिले आहे कि '' जेव्हा ब्रह्माजींद्वारे सतयुगी सृष्टी रचनेचे कार्य तीव्र गतीने झाले नाही आणि त्या कारणाने ते निरूत्साहित होते तेव्हा शिवाने ब्रह्माच्या शरीरात प्रवेश केला. ब्रह्माजींना पुनर्जिवीत करून त्यांच्या मुखाद्वारे सृष्टीची रचना केली''. शिव पुराणात अनेक वेळा हा उल्लेख आला आहे कि भगवान शिवाने प्रथम ब्रह्माला रचले आणि नंतर त्यांच्याद्वारे नवीन सृष्टीची रचना केली.** या पौराणिक उल्लेखाचा हा ही भाव आहे कि परमपिता परमात्मा शिव प्रजापिता ब्रह्माच्या मस्तकात ( ललाटावर ) अवतरीत झाले आणि त्यांच्या मुखाद्वारे ईश्वरीय ज्ञान आणि सहज राजयोगाचे शिक्षण देऊन त्यांनी विश्वाचे कल्याण करविले. महाभारतात ही लिहिले आहे कि भगवानाने ब्रह्मा तनात प्रवेश करून ज्ञान दिले आणि सतयुगाची पुन: स्थापना केली.



### माझे हे क्षण अविस्मरणीय झाले



जे पूर्ण ब्रह्म परमेश्वर शिवबाबा आहेत. त्यांचे ध्यान करून मार्गदर्शन घेण्यासाठी एकत्र होऊन जेथे सर्वजण परमेश्वराची अनुभूती करतात ते म्हणजे हे प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय.ज्या ज्ञानाद्वारे साक्षात् ईश्वराची प्राप्ती होते ते हेच ज्ञान होय .जर विश्वात सुंदरतम् असे कोणते स्थान असेल तर ते मा.आबूमध्ये वसलेले ब्रह्माकुमारीज़चे आश्रम आहे. ईश्वराची प्राप्ती केवळ इथेच होवू शकते.-**डॉ.स्वामी केशवानंद सरस्वती,काशी.**

### ईश्वरच प्रेम करू शकतात



दुनियावी विविध संबंधांमधून मला नेहमीच मोहाची भासना येते, त्या संबंधांद्वारे कधी रडावेही लागत असे. मी विचार करीत असे कि मला कोणी असे भेटावे की जे मला भरपूर सुख देईल आणि त्याच्या बदल्यात माझ्याकडून कशाचीही अपेक्षा करणार नाहीत. त्याचीच भरपाई परमात्म्याने केली आणि अशी केली कि मी भरपूरच होऊन गेलो. हे ईश्वरीय विश्व विद्यालय वास्तविक देवत्वाला घडविणारे विश्व विद्यालय आहे. मला इथे येवून परमात्म भेटीने जो अतिंद्रिय सुखाचा अनुभव झाला,तो अनुभव सर्व लोकांनी ही घ्यावा अशी माझी इच्छा आहे . मला असे वाटते कि परमात्मा माझा झाला आहे, आणि मी त्याचा झालो आहे. मी खूप सुखी झालो आहे. हे आध्यात्मिक ज्ञान संपूर्ण मानव समाजासाठी एक असा पथदर्शक असून,त्याने मनुष्याचे नैतिक जीवन तर सुधारतेच त्याचबरोबर त्याचे अन्तर्मन ही निर्मळ होत जाते. - **पी.के सिंह. डिप्युटी डायरेक्टर जनरल दूरदर्शन, दिल्ली.**

# महापरिवर्तनाचा पाया घातला गेला आहे!!!

**''अशी एक मान्यता आहे कि जिथे विरोध असतो तिथे परिवर्तन हे होतेच. परंतु ते परिवर्तन सामान्य अथवा स्थायी असते का? कदाचित नाही! कारण जेव्हा आपल्याला शांती स्थापन करायची असते तेव्हा ती विरोधाच्या मार्गाने का करावी? हेच कार्य परमात्मा निर्विरोध स्वरुपात आपल्याकडून करवून घेत आहेत आणि त्याचा पाया त्यांनी भारतातील माउण्ट आबू मध्ये घातला आहे. आज मानवी परिस्थितीला बदलण्यासाठी किंवा असे म्हणता येईल की महापरिवर्तनासाठी शांतीचा तो सागर परमात्मा शिव या धरतीवर अवतरीत झाला आहे.''**



**स**माजात एक मान्यता प्रसिद्ध आहे कि कुठल्याही गोष्टीचा जेव्हा विरोध होतो तेव्हा त्या गोष्टीद्वारे परिवर्तनही होते. परंतु सध्याच्या काळी हे परिवर्तन सर्वमान्य व स्थायी मानले जात नाही कारण त्याचा सहजपणे लोक स्वीकार करीत नाहीत. मदर टेरेसा ही अशा रैलींमध्ये कधीही जात नसे जिथे विरोध केला जात असे. त्यांचे मत असे होते कि जर तुम्ही शांती स्थापन करीत आहात तर ते कार्य शांतीपूर्वक व्हायला हवे,न कि विरोधाने. या शृंखलेच्या आधारेच भारत भूमीवर अगदी सहज व शांतीपूर्वक पद्धतीने महापरिवर्तनाचे हे कार्य आरंभ झाले आहे. स्वयं परमात्म्याने त्याचा विड़ा उचलला आहे. ऐकून आपणाला जरूर आश्चर्य वाटत असेल परंतु ही गोष्ट पूर्ण रूपाने सत्य आहे. अरावली पर्वत शृंखलांच्यामध्ये वसलेले **माउण्ट आबू** महापरिवर्तनाच्या या कार्याचे एक उदाहरण बनले आहे. इथे स्वत: संकटहर्ता, सुख दाता, सर्व आत्म्यांचे पिता परमपिता शिव परमात्मा, निराकार ज्योतिर्बिंदु आपले साकार माध्यम पिताश्री प्रजापिता ब्रह्माजींच्या शरीरात अवतरीत होऊन, ब्रह्मावत्स ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारींच्या द्वारे महापरिवर्तनाचे कार्य युद्ध स्तरावर करीत आहेत. हे परिवर्तन स्वैच्छिक आहे अर्थात् इथे कोणावरही कोणताही दबाव अथवा जबरदस्ती केली जात नाही. परमात्मा सर्वप्रथम सर्व आत्म्यांना त्याचा स्वत:चा परिचय करवितात कि तुम्ही एक सुंदर, शक्तिशाली, अविनाशी आत्मा आहात. अज्ञानामुळे स्वत:ला शरीर समजत आहात ज्यामुळे दु:ख आणि अशांतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हेच एक परिवर्तन आहे जे आपल्याला स्वर्णिम विश्वाकडे घेवून जाणारे आहे.जेव्हा सर्वजण स्वत:ला या महापरिवर्तनात ' मी एक अविनाशी, शांत आत्मा आहे आणि माझ्यामध्ये अविनाशी सातही गुण आहेत, असे मानू लागतो तेव्हा हेच परिवर्तन आपणास स्वर्णिम दुनियेकडे घेवून जाण्यात मदत करते'.

**हे महान कार्य मागील 79 वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. येथे देश-विदेशातील अनेकानेक मनुष्य आत्म्यांनी स्वत:च्या जीवनात परिवर्तन करून स्वर्णिम दुनियेत येण्यासाठी नोंदणी केली आहे.**

**महापरिवर्तनाच्या या पावन समयी परमात्मा शिव आपणा सर्वांना आवाहन करीत आहेत. या... माझ्या लाडक्या वत्सांनो, मी तुमच्यासाठीच तर या धरतीवर, कलियुगी दुनियेचे सतयुगी दुनियमध्ये परिवर्तन करण्यासाठी अवतरीत झालो आहे.संपूर्ण विश्वात 137 देशांमध्ये जवळ-जवळ 9 हजाराहूनही अधिक सेवाकेंद्र, त्यात 25 हजाराहून अधिक समर्पित बंधू आणि भगिनी आपली सेवा जनहितासाठी स्वेच्छेने देत आहेत. एका चरणबद्ध पद्धतीने परिवर्तनासाठी निरंतर राजयोग ध्यानाचा अभ्यास आणि संबंधित ज्ञान शिकल्याने आपण आपल्या जीवनात अमूलाग्र बदल घडवून आणू शकतो. तर या आपण सर्व मिळून या दिशेने पहिले पाऊल उचलूया!**

## परमात्मा 'शिव' गीता ज्ञान दाता

**स**र्व आत्मे, महात्मे, देवता इत्यादींचे परमात्मा, परमपिता एक आहेत. त्यांनाच भगवान अथवा परमात्मा असे म्हटले जाते. ज्ञान, शक्ती, आनंद, प्रेम आणि पवित्रतेचा सागरही तो एकच आहे. ही महीमा अन्य कोणी सामान्य आत्मा, महात्मा, देवात्मा इत्यादींची होऊच शकत नाही.हे दिव्य कर्तव्य करण्यासाठीच तर तो दिव्य जन्म घेतो, तो मातेच्या गर्भातून जन्म घेत नाही. तो शैशव (बाल, युवा व प्रौढ) इत्यादी अवस्था किंवा राज्य-भाग्य अथवा सुख-सपंत्तीचा उपभोग घेत नाही कारण तो अभोक्ता आणि कर्मातीत आहे. तो संपूर्ण सृष्टीचा माता-पिता,अविनाशी शिक्षक आणि एकमात्र सद्गुरु अर्थात् सद्गती दाता आहे. निराकार शिव वास्तविक स्वरूपात परमात्म्याचे नाव आहे. परमात्मा आपले साकार माध्यम प्रजापिता ब्रह्माद्वारे जे ज्ञान देतात ते अती सहज आहे, ते कोणीही शिकू शकते. गीता शब्द गीत या शब्दापासून बनला आहे, कारण गीत अगदी मनमोहक आणि मधुर असते, जे सर्वजण ऐकतात आणि आनंद विभोर होऊन जातात. तसेच हे ज्ञान ही एका गीता प्रमाणेच आहे, जे लक्षपूर्वक ऐकून, जीवनात त्याची धारणा करून त्याचा आनंद घेवून मनमोहक 'कृष्ण'



जन्माला येतो. परमात्मा शिव सत्य गीता ज्ञान देतात, जी गीता ऐकूनच मनमोहना सारखे बनता येवू शकते. श्रीमद्भगवत्गीतेसाठी विश्वातील लोक म्हणतात की गीतेचे श्रवण केल्याने मोक्ष आणि स्वर्गाची प्राप्ती होते, आणि जीवनाच्या अंतीम समयी गीता जरूर ऐकली पाहिजे ही मान्यता आहे. ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे की अनेकांनी आपल्या जीवनात आणि मृत्यूच्या वेळी गीता ऐकली आहे परंतु त्यांना मोक्ष किंवा स्वर्ग प्राप्त झाला असेल का? आज त्याच मोक्ष आणि स्वर्गाची प्राप्ति करवून देण्यासाठी स्वत: **परमात्मा शिव** धरतीवर अवतरीत होऊन सहज गीता ज्ञाना द्वारे स्वर्णिम दुनिया स्थापन करण्याचे अद्भुत कार्य करीत आहेत.तसे गीतेत वर्णन आहे कि,मला (परमात्म्याला) समजण्यासाठी **दिव्य चक्षु** अर्थात् दिव्य ज्ञान असावयास हवे. त्याशिवाय मला कोणीही ओळखू शकत नाही. परमात्मा शिवाच्या या ज्ञानालाच गीता ज्ञान म्हटले पाहिजे,असे आमचे मानणे आहे. जे ज्ञान सर्वांनी समजून, त्या मार्गाने चालत राहून त्याला आपल्या जीवनात धारण करून देवत्व प्राप्त करु शकतात. गीता ज्ञान त्या एकमात्र ज्ञानाचा सागर,पतित पावन, सर्व आत्म्यांचे परमपिता, मानवास देवता बनविणा-या,भगवान शिवाने दिले होते, जो श्री कृष्णाचाही परमपिता आहे. श्री कृष्णाने तर त्याच परम सद्गुरु शिवाकडून नारायण पद प्राप्त केले होते. म्हणूनच वृंदावनात गोपेश्वराचे मंदिर आहे ज्यात दाखविले गेले आहे की भगवान **''शिव''** श्री कृष्णाचे ही पूज्य, आराध्य आहेत आणि गोप-गोपिकांचेही ईश्वर आहेत. ☺

## दुनियेच्या नियंत्याने बनविला प्रथम अभियंता

### दादा लेखराज यांना नविन दुनियेच्या स्थापना आणि कलियुगाच्या विनाशाचा साक्षात्कार झाला होता.

**दा**दा लेखराज एक दिवस वाराणसी मध्ये आपल्या मित्राच्या घरी गेले असता त्यांना रात्रीच्या वेळी अचानक या दुनियेच्या भयंकर महाविनाशाचा साक्षात्कार झाला. अशा महाविनाशक शस्त्रास्त्रांचा साक्षात्कार झाला, ज्यांच्याविषयी समाजात लोकांना अजून अजिबात कल्पनाही नव्हती. त्यानंतर नविन दुनियेच्या स्थापनेसाठी आकाशातून उतरणा-या देवी-देवतांचाही साक्षात्कार झाला.

दादा लेखराज यांना त्यावेळी या साक्षात्कारांचे रहस्य उलगडले नाही. त्यानंतर ते जेव्हा आपल्या घरी पोहोचले आणि एक दिवस आपल्या खोलीत बसले असता त्यांच्या शरीरात



निराकार परमात्म्याने प्रवेश करून त्यांना साक्षात्कार करविला आणि स्वत: परमात्म्याने त्यांना आपला परिचय दिला कि -**''निजानंद स्वरूपम् शिवोहम्, शिवोहम् , आनंद स्वरूपम् शिवोहम्, शिवोहम् ,प्रकाश स्वरुपम् शिवोहम्, शिवोहम्''....**

या परिचया बरोबरच स्वत: परमपिता परमात्म्याने आदेश दिला की आता तुला नवीन दुनियेच्या स्थापनेचे कार्य करावयाचे आहे. येथूनच सुरुवात झाली परमपिता परमात्म्याच्या सृष्टी परिवर्तनाच्या गुप्त कार्याची,जे आजपर्यंत अविरत चालू आहे.

### व्यर्थ पासून मला मुक्ति मिळाली.



**प**रमात्मा स्वत: या ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या माध्यमातून सर्वांना जीवन जगण्याची कला शिकवित आहेत, म्हणूनच हिला गॉडली युनि-व्हर्सिटी असेही म्हटले जाते.जेव्हा मी परमात्म्याला भेटलो तेव्हा माझे सगळे व्यर्थ संकल्प समाप्त झाले आणि सकारात्मक संकल्पांची रचना होऊ लागली. माझ्या शरीरात ऊर्जेचा सतत प्रवाह वाहू लागला आणि असा अनुभव होऊ लागला की याशिवाय दुनियेत सर्व काही सारहीन आहे. या ज्ञानामुळे मला जी एकाग्रतेची शक्ती मिळाली आहे त्यामुळे मला दोन पक्षांमधील मतभेद सोडविण्यास फारच मदत मिळते. या दुनियेचे परिवर्तन या ईश्वरीय विश्वविद्यालयाद्वारेच संभव आहे. **-बी.डी. राठी,** हाई कोर्ट जज, ग्वालियर.

### होय, मी परमात्म्याला भेटलो आहे.



**हे** एक असे विश्व विद्यालय आहे जिथे जाती, धर्म, देशाचा कुठलाही भेदभाव पाळला जात नाही. इथेच हे शिक्षण मिळते ज्याद्वारे आपण स्वत:ला आणि परमात्मा पित्याला ओळखु शकतो. ही संस्था अन्य संस्थांपासून वेगळी आहे कारण इथे सर्वांना उच्च संस्कार जागृत करण्याचे शिक्षण मिळते. मी या संस्थेत येवून स्वयं निराकार परमात्म्याला भेटलो, त्यांच्याशी बोललो. त्या अनुभवाचे वर्णन करणेही मला असंभव आहे. कोणत्याही धर्मसंस्थापकाने,महान नेत्याने विश्वाची इतकी सेवा केली नाही जितकी परमात्मा शिवाच्या अवतरणानंतर प्रजापिता ब्रह्माबाबांनी केली.**-वी.ईश्वरैय्या, पूर्व एक्टिंग चीफ जस्टिस, आंध्र प्रदेश उच्च न्यायालय.**

### परमात्मा शिव मनुष्याला देवता बनवित आहेत.



**प्र**जापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय अन्य विद्यालयांपेक्षा वेगळे आहे कारण याची स्थापना स्वयं परमात्म्याने केली आहे. या विश्व विद्यालयाचा उद्देश्य आहे मनुष्याला देवता बनविणे. परमात्म्याला भेटल्यानंतर आपले जीवन दिव्यतेने भरून जाते, आपल्या जीवनात आध्यात्मिक उन्नती होऊ लागते आणि दिव्य शक्ति प्राप्त होतात ज्यांचा आपण कोणत्याही परिस्थितीमध्ये उपयोग करून सफलता प्राप्त करु शकतो. - **धरमेश, सिटिंग जज, राजकोट.**

# सर्वांनी केली त्यांचीच महापुजा...व केले त्यांचेच स्मरण



“परमात्म्या विषयी म्हटले जाते की तो असा आहे, तो तसा आहे, परंतु तो कसा आहे याविषयी सर्वामध्ये गैरसमज आहे.अगदी आदी काळापासून आजपर्यंत परमात्म्याला सर्वांनी ज्योतिबिंदू रूपातच पूजले किंवा स्मरण केलेले आहे.मग ते स्मृतिचिन्ह लिंगरूप असो किंवा प्रकाश स्वरूप वा एखाद्या गोल दगडाच्या स्वरूपात असो. त्याच निराकार परमात्मा शिवाचे सर्वांनी स्मरणही केले आणि त्यांच्या स्मृती वेगवेगळया ठिकाणी लिंगरूपात स्थापितही केल्या आहेत.त्या स्मृती कोणत्याही साकार प्रतिमा नाहीत परंतु एका प्रतिकाच्या रूपात आहेत. त्याच स्मृतींची सर्व देवात्म्यांनी,धर्मात्म्यांनी,पुण्यात्म्यांनी व महान आत्म्यांनी आठवण व पूजा केली.”

## ईसा मसीहा ने परमात्म्याला “दिव्य ज्योति” म्हटले.

ईसा मसीह ( जिजस क्राईस्ट) नी गॉडला लाईट म्हटले आहे,**गॉड इज लाईट,आई एम द सन ऑफ गॉड.** जिजस् ने कधीही असे म्हटले नाही कि आई एम गॉड. त्यांनी त्या प्रकाशाला नेहमीच परमात्म्याचे स्वरूप म्हटले आहे.

## हज़रत मुसा किंवा ईब्राहीम

ओल्ड टेस्टामेंट मध्ये लिहीले गेले आहे कि हज़रत मुसा शिनाई पर्वतावर गेले. तिथे त्यांना परमज्योतीचा साक्षात्कार झाला. त्याला पाहून हज़रत मुसा ने उद्गार काढले **‘जेहोवा’**. त्या तेजाला नाव दिले ‘जेहोवा’ आणि त्या प्रकाशाने त्याला दोन दगडांवर दहा आदेश लिहावयास दिले जे आज ही त्यांच्या ओल्ड टेस्टामेंट मध्ये लिहीले गेलेले आहेत.

## एक ओंकार, सत्नाम

**शि**खांचे धर्म संस्थापक गुरू नानकांनी ही परमात्म्याला एक ओंकार असे म्हटले, आणि ज्योतिस्वरूप शिव परमात्म्याच्या एका प्रसिद्ध मंदिराचे नाव ही ओंकारेश्वर आहे. त्यांनी अगदी स्पष्ट शब्दात परमात्म्याच्या सत्य स्वरूपाचे वर्णन केलेले आहे. तो निराकार आहे, निर्वैर आहे, सत्नाम आहे.ज्याला काळ सुद्धा खाऊ शकत नाही. गुरू गोविंद सिहा चे **‘दे शिवा वर मोहे’** शब्द त्यांच्या परमात्मा शिवाकडून वरदान मागण्याची आठवण करून देतात यावरून स्पष्ट होते की परमात्मा शिव एकाच धर्माचे पूज्य नाहीत परंतु विश्वातील सर्व आत्म्यांचे परमपूज्य परमपिता आहेत.


## मिस्त्र मध्ये ही स्विकारले परमात्म्याचे अस्तित्व

**मिस्त्र** मध्ये शिवलिंगाची पूजा आईसिस आणि ओसिरीस नावाने होत असे. ओसिरीस शब्द **‘ईश’** शब्दाने बनलेला आहे. तिथे शिवलिंगाच्या प्रतिमेबरोबर नंदीगण रूपात मूर्ती ठेवत असत.

## मुस्लिम धर्मामध्ये नूर-ए-ईलाही


**भा**रतामध्ये परमपिता परमात्मा शिवाच्या ज्योतिस्वरूप शिवलिंगाची व्यापक स्तरावर मान्यता तर आहेच, परंतु भारताबाहेरही दुस-या धर्माचे लोक परमात्म्याच्या त्याच स्वरूपाला मानतात. मुसलमानांचे पवित्र स्थळ मक्केमध्येही ज्योति आकाराचा दगड आहे ज्याचे मोठया प्रेमाने आणि सन्मानाने चुंबन घेतले जाते. त्याला ते ‘संग-एं-असवद’असे म्हणतात. परंतु ते सुद्धा या रहस्याला जाणत नाहीत की त्यांच्या धर्मात मूर्ती पूजेला मान्यता नसतानाही शिवलिंगाच्या आकाराचा दगड का स्थापीत केला आहे? त्याला ते **‘नूर-ए-ईलाही’** म्हणतात. अर्थात् तो नूर, ते तेज,त्याचे तेजोमय स्वरूप ज्याला आपण ज्योतिर्लिंगम् म्हटले किंवा ज्योतिस्वरूप असे संबोधले. ज्योती म्हणजे तेज. म्हणूनच जेंव्हा मुसलमान नमाज पडतात तेंव्हा ते मक्केच्या दिशेने तोंड करून बसतात.ज्याला भारतवर्षात मक्केश्वर असेही म्हटले जाते. अर्थात् मुसलमानांनी अल्लाह, नूर-ए-ईलाही म्हणून निराकाराची आठवण केली.

## शिव,श्री रामाचे ही आराध्य



**प**रमात्मा शिवाची पूजा रामेश्वरम्च्या रूपात स्वत: श्री रामाने ही केली. शिव श्री रामाचेही ईश्वर आहेत. विचार करण्याची गोष्ट आहे कि जर श्री राम ईश्वर होते तर त्यांना त्या निराकार ज्योतिर्लिंगम्ची पूजा करण्याची काय आवश्यकता होती? त्यांना माहित होते कि रावणाला आपल्या ज्या शक्तीचा अभिमान आहे ती त्याने परमात्मा शिवाची तपस्या व आराधना करून प्राप्त केली . असे म्हटले जाते कि रावण सुद्धा शिवाचाच पुजारी होता. तेव्हा शिवाच्या शक्ती समोर सामना करण्यासाठी, परमशक्ती परमात्म्याकडून शक्ती मिळविल्या शिवाय युद्धात विजय असंभव होता, यावरून हे सिद्ध होते कि श्री रामाने ही शिवाचीच आराधना केली होती.

## श्री कृष्णाने ही केले शिवा चे पुजन



**म**हाभारत युद्धाच्या आधी कुरूक्षेत्राच्या मैंदानावर स्वयं श्री कृष्णानेही थानेश्वर,सर्वेश्वराची स्थापना करून त्या परमपिता सर्व शक्तीवान,गुणांचे भंडार, निराकार शिवाची पूजा-अर्चना केली. आणि त्या शक्तिंच्या दात्याकडून शक्ती प्राप्त करून युद्धाच्या मैदानावर उतरले. श्री कृष्णाने पांडवांकडून ही शिवाचीच पूजा करवून घेतली होती.त्यांनंतरच ते युद्धाच्या मैदानावर उतरले आणि कौरवांवर विजय प्राप्त केला. शिवाला भोलेनाथ असेही म्हटले गेले आहे कारण ते सहजच प्रसन्न होणारे आहेत.

## पारशी धर्मामध्ये ही ज्योती स्वरूप परमात्म्याची मान्यता

**पा**रसींच्या अग्यारी मध्ये गेले असता तिथे **‘होली फायर’** पहावयास मिळते. असे म्हटले जाते कि पारसी लोक जेव्हा ईराण मधुन भारतात आले तेव्हा ज्वलंत ज्योतीचा तुकडा घेऊन आले, तिला त्यांनी **अखंड ज्योती** असे म्हटले. आज ही नवीन अग्यारी स्थापन केली जाते तेव्हा त्या ज्वलंत ज्योतीचा एक तुकडा तिथे स्थापित केला जातो, जी सतत जळत आली आहे, जी सदा अखंड आहे, जे परमात्म्याचे दिव्य स्वरूप आहे.


## गिरजा घराचे रहस्य

**रो**म मध्ये शिवलिंगाला **‘प्रियपस’** असे म्हटले जाते. तर ईटली मध्ये गिरजा घरात शिवलिंगाची प्रतिमा ठेवलेली आहे. गिरजा शब्द गिरीजा शब्दापासून बनला आहे. गिरीजाचा अर्थ आहे पार्वती. सर्व आत्मा रूपी पार्वतींचा पती परमात्मा शिवाची प्रतिमा तिथे स्थापित केली जाते, म्हणूनच चर्चचे नाव **गिरजा घर** आहे.

# शंकरानेही केले शिवाचे ध्यान

**का**ही भक्त ‘शिव’ आणि ‘शंकर’ या मधील अंतर समजत नाहीत. ते म्हणतात की शिव आणि शंकर एकाच ईष्टाची दोन नावे आहेत. आता प्रश्न असा पडतो कि **‘शिवलिंग’** नावाची प्रतिमा आणि **‘शंकरा’** ची देवता स्वरूपात मूर्ती हे दोन वेगवेगळे रूपे असणारी स्मरण चिन्हे का आहेत? एखाद्या व्यक्तीच्या पित्याला त्याचे मित्र ‘ गुप्ता जी’ किंवा ‘रमेश चंद्र जी’ आणि त्यांचे माता-पिता ‘रम्मू’ किंवा ‘मेशी’ म्हणून बोलावत असतील, हे होऊ शकते परंतु त्या व्यक्तीचा फोटो अथवा कलाकाराद्वारे बनविलेली त्याच्या मूर्तीचे तर एकच रूप असेल ना? बाळ स्वरूपाचे आणि वृद्ध स्वरूपाचे दोन वेगवेगळया रूपांचे ही फोटो असू शकतील. ज्यात फार अंतर दिसून येईल परंतु दोघांचे सशरीरी,सकाय अर्थात् पिंड धारण केले असेल ना? परंतु शिवाची पिंडी तर **अंडाकार** असते आणि शंकाराची मूर्तीसुद्धा शरीरासहीत स्थापना व पूजन केले जाते.इतकेच नाही तर त्या देवाकार मूर्तीचे एखादे अंग जराही खंडीत असेल तर त्या मूर्तीला पूजन योग्य मानले जात नाही. मग शिवाच्या मंडलाकार प्रतिमेला तर **‘ज्योतिर्लिंगम्’** मानले जाते आणि शंकराला हे नाव दिले जाते. शंकराला तर नेहमी समाधीस्त दाखविले जाते,जे या गोष्टीचे प्रतीक आहे कि ते कोणतेतरी ध्येय मनात ठेवून ध्यानमग्न अवस्थेत बसले आहेत.तर, शिवाच्या पिंडीद्वारे असा कुठलाही भाव प्रदर्शित होत नाही. तेव्हा दोघांमधले अंतर स्पष्ट आहे. तरही एकीकडे काही लोक शिवलिंगाला पृष्ठभागांवर ठेवून त्यावर शंकाराची मुखाकृती दाखवितात आणि अन्य काही चित्रकार शंकरातून ज्योतिर्लिंगाला प्रकट होतांना दाखवितात. पुराणामध्ये कथा आहे की ‘शिव’, शंकराच्याच शरीराचा एक भाग आहे.खरोखरच ही तर मनुष्याच्या अज्ञानाची पराकाष्ठाच झाली आहे. एकीकडे खंडीत शरीराच्या देवतेची पूजाही करीत नाहीत आणि दूसरी कडे शरीराच्या कुठल्या तरी एका भागाची पूजा करतात. यावरून स्पष्ट होते कि ही मान्यता विवेक संमत नाही.





## जपान मध्येही चिंकोनसेकी चे स्मरण

**ज**पानमध्ये शिकोनिजम् सेक्ट वाले तीन फूटाच्या ऊंची वर आणि तीन फूट दूर बसून एक ताटामध्ये ठेवलेल्या लाल रंगाच्या दगडाकडे ध्यान केंद्रीत करतात. त्या दगडाला ते **‘करनीचा पवित्र दगड’** असे म्हणतात. त्याला चिन्कोनसेकी असे नाव दिले आहे,ज्याचा अर्थ आहे शांतीचा दाता. ते त्याला परमात्म्याचे स्वरूप मानतात. **चीन** मध्ये शिवलिंगाला **‘हुवेड-हिफुह’** म्हटले जात असे, आणि याच नावांनी त्याची पूजा होत असे. बेबीलोन मध्ये शिवलिंगाला शिउम् म्हटले जात असे. **मिस्त्र** मध्येही **सेवा** नावाने पूजा होत असे. **फिजी** देशवासी शिवाला **‘सेवा’** किवा **‘सेवाजिया’** नावाने पूजतात.

-: स्थानीक सेवाकेंद्राचा पत्ता :-

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय

Email.- मो.